**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रसिद्धीपत्रक**

- **७ दिवसाच्या ३१९६ श्रीगणेश व १३१ गौरी मूर्तींना कृत्रिम तलावात भावपूर्ण निरोप**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांचे मार्गदर्शन व सूचनेनूसार विसर्जनासाठी शहरात २९ ठिकाणी ३५ कृत्रिम तलाव तयार करण्यात आले आहेत. कृत्रिम तलावात एकूण ३३२७ श्रीगणेश व गौरी मूर्तींना भावपूर्ण निरोप देण्यात आला. या विसर्जन स्थळांवर एकूण शाडूचे ५६० तर २७२४ प्लास्टर ऑफ पॅरीस (POP) च्या मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. १३१ प्लास्टर ऑफ पॅरीसच्या (POP) गौरी मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. सात दिवसांच्या विसर्जनात ३०५ सार्वजनिक श्री गणेशमूर्ती व २८९१ घरगूती श्री गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. कालच्या दिवसात झालेल्या विसर्जनात ४३ सार्वजनिक श्रीगणेशमूर्ती हया ६ फुटावरचे होते.

मिरा भाईंदर शहरात दरवर्षीप्रमाणे श्रीगणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा होत आहे. यातच काल सात दिवसांच्या गणरायाचे व गौरी देवीचे विसर्जन मोठ्या भक्तिभावाने आणि श्रद्धेने करण्यात आले. पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने उभारण्यात आलेले कृत्रिम तलावाला शहरातील नागरीकांनी चांगला प्रतिसाद दिला आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार महापालिका सहाय्यक आयुक्त व अधिकारी यांनी विसर्जन स्थळी पाहणी केली. सर्वच विसर्जनस्थळांवर सुरक्षेच्या दृष्टीने बांबूंचे बॅरेकेटींग करण्यात आले होते. अग्निशमन सेवक, महानगरपालिका स्वयंसेवक यांच्यासह वैद्यकीय आरोग्य व सार्वजनिक आरोग्य सेवाही कार्यरत होते. सर्व विसर्जन स्थळांवर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून पोलीस यंत्रणा तसेच सीसीटीव्ही यंत्रणा अत्यंत सतर्कतेने कार्यरत होती. यापुढील काळातील श्रीगणेश विसर्जन अशाच प्रकारे सुव्यवस्थित रितीने संपन्न होण्यासाठी ०१ ते ०६ प्रभाग समिती कार्यालय क्षेत्रात सर्व यंत्रणा सुसज्ज असणार आहे. तरी शहरातील सर्व नागरिकांनी मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनास यापुढेही श्रीगणेश विसर्जन वेळेस पूर्ण सहकार्य करावे व ६ फूटापर्यंतच्या सर्व श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावातच करण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.